22-03-2025-Dai-01_DH_PAN_01_04_2016-1.qxp 03/21/2025 10:23 PM Page 1

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com

नव्या निर्णयामुळे लोटलीमधील शेतकऱ्यांना न्यायाची आशा? पान ३ वर



आयपीएलचा आजपासून थरार..! पान ४ वर

वेर्णा, शनिवार, २२ मार्च २०२५ | पाने ४ | ₹ ४

| REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 199 | Verna, | facebook.com/dainikherald | Saturday 22 March 2025 | Pages 4 | ₹ 4

शुल्कवाढीविरोधात मडगाववासीय एकवटले!

२८ मार्चला देणार मडगाव पालिकेवर धडक : त्वरित मागे घेण्यासाठी अल्टिमेटम

■ टीम दैनिक हेराल्ड :

मडगाव, दि. २१ : मडगाव पालिकेच्या प्रस्तावित सेवा शुल्कवाढीला नागरिकांनी तीव्र विरोध दर्शवला असून, हा निर्णय त्वरित मागे घेण्यात आला नाही तर येत्या २८ मार्चला मडगाव नगरपरिषदेच्या इमारतीसमोर मोठ्या प्रमाणावर निदर्शने आयोजित केली जाणार आहेत. शॅडो कौन्सिल ऑफ मडगावसोबतच फातोर्डाचे आमदार विजय सरदेसाई यांनी देखील मडगाव पालिकेने प्रस्तावित केलेल्या कर आणि सेवा शुल्क वाढीवर तीव्र नाराजी व्यक्त केली असून मडगावमधील नागरिक आणि करदात्यांच्या शिष्टमंडळाशी झालेल्या बैठकीनंतर त्यांनी या वाढीला अभूतपूर्व आणि अन्याय ठरवले आहे.

मडगाव रहिवाशांना भीती आहे की, या शुल्कवाढीमुळे घरगुती आणि व्यावसायिक खर्चांवर मोठा आर्थिक भार पडेल. व्यापार परवाने, बांधकाम परवाने, स्वच्छता शुल्क आणि इतर महानगरपालिका शुल्कांमध्ये प्रस्तावित वाढ अन्याय आणि अतिरेकी असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे, विशेषतः अशावेळी जेव्हा अनेक लोक आर्थिक संकटातून सावरत आहेत.

नव्या शुल्कवाढीमुळे लहान व्यावसायिक, व्यापारी आणि मध्यम उत्पन्न गटांवरील आर्थिक ताण वाढणार आहे. उदाहरणार्थ, अल्प शुल्क भरून व्यापार परवाना घेणाऱ्या लहान दुकानदारांना आता अनेक पटींनी अधिक पैसे मोजावे लागतील. परिणामी, या व्यावसायिकांना ग्राहकांकडून अधिक शुल्क आकारावे लागेल किंवा व्यवसाय बंद करण्याचा धोका पत्करावा लागेल. तसेच, घराच्या किरकोळ नूतनीकरणासाठी आवश्यक असलेल्या परवान्यांच्या दरांमध्येही मोठी वाढ प्रस्तावित आहे. त्यामुळे सामान्य नागरिकांना मोठा आर्थिक फटका बसणार आहे.

शॅडो कौन्सिल ऑफ मडगाव (एससीएम) चे संयोजक सावियो कुतिन्हो यांनी प्रस्तावित शुल्कवाढ अव्यवहार्य आणि अनुचित असल्याचे सांगितले. एमएमसीने ही वाढ आवश्यक का आहे आणि नागरिकांना त्याचा फायदा कसा होईल, याचे स्पष्ट स्पष्टीकरण दिलेले नाही. त्याऐवजी, त्यांनी मूलभूत कामेही पूर्ण केलेली नाहीत. सुमारे ४५ % मालमत्तांचे परवाने अद्याप अद्ययावत नाहीत. अशा परिस्थितीत शुल्कवाढ कशी न्याय्य ठरू शकते? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

एमएमसीच्या सार्वजनिक सूचनेत शुल्कवाढ २०% पर्यंत मर्यादित असल्याचे नमूद करण्यात आले होते. मात्र, प्रत्यक्ष शुल्करचना तपासल्यास काही शुल्कात ६६% तर काही ठिकाणी ५५०% पर्यंत वाढ प्रस्तावित असल्याचे दिसून येते. ही जनतेची दिशाभूल करण्याचा प्रयत्न आहे. कोणत्याही शुल्कवाढीचा योग्य आधार आणि स्पष्टीकरण नसल्याने हा निर्णय अन्याय्य ठरतो, असे कुतिन्हो यांनी नमूद केले. त्यांनी स्पष्ट इशारा दिला की, नागरिकांचा आक्रोश वाढत राहिल्यास आंदोलन तीव्र करण्याशिवाय पर्याय राहणार नाही.

शुल्कवाढीबाबत पारदर्शकता आणि जनतेशी संवाद न साधल्याबद्दल रहिवाशांमध्ये मोठा रोष आहे. हे केवळ आर्थिक भाराचे नाही, तर प्रशासनाच्या कार्यपद्धतीच्या गंभीर समस्येचे उदाहरण आहे. एमएमसीने नागरिकांना विश्वासात घेतले नसल्याने ते उपेक्षित वाटत आहेत, अशी प्रतिक्रिया एका स्थानिक रहिवाशाने दिली.

मडगावमधील नागरिकांनी या अन्याय्य शुल्कवाढीविरोधात लढा देण्याचा निर्धार केला आहे. २८ मार्च रोजी सकाळी १०:३० वाजता मडगाव पालिकेच्या इमारतीसमोर मोठ्या प्रमाणावर निदर्शने आयोजित केली जाणार आहेत. विविध सामाजिक संघटना आणि व्यापारी संघटनांनीही या आंदोलनाला पाठिंबा दर्शवला आहे.

फातोर्डाचे आमदार विजय सरदेसाई यांनी देखील मडगाव पालिकेने प्रस्तावित केलेल्या कर आणि सेवा शुल्क वाढीवर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. मडगावमधील नागरिक आणि करदात्यांच्या शिष्टमंडळाशी झालेल्या बैठकीनंतर त्यांनी या वाढीला अभूतपूर्व आणि अन्याय ठरवले आहे. सरदेसाई यांनी या करवाढीच्या संदर्भातील विसंगतींवर प्रकाश टाकत, ही वाढ अनावश्यक असल्याचे सांगितले. विशेषतः, नगर परिषदेने अद्याप ४५% परवाना नसलेल्या जागांचे सर्वेक्षण पूर्ण केले नसताना, नागरिकांवर आर्थिक भार

पान २ ▶

अखेर गोवा विद्यापीठ आले भानावर !

सहाय्यक प्राध्यापकाविरोधात पोलिस तक्रार

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. २१ : गोवा विद्यापीठाने पेपरफुटीच्या आरोपांची चौकशी करण्यासाठी स्थापन केलेल्या तथ्य शोध समितीच्या अहवालाच्या आधारे विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागातील सहाय्यक प्राध्यापक डॉ. प्रणव नाईक यांच्या विरोधात एफआयआर दाखल करण्यासाठी आगशी पोलिसांना कळवले आहे.

विद्यापीठाने जारी केलेल्या अधिकृत निवेदनात म्हटले आहे की, तथ्य शोध समितीच्या अहवालाच्या आधारे, विद्यापीठाने डॉ. प्रणव नाईक यांनी केलेल्या अनधिकृत आणि बेकायदेशीर कृत्यांची चौकशी करण्यासाठी आगशी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. यासोबतच, हा मुद्दा कार्यकारी परिषदेपुढे ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला असून, मार्च २०२५ च्या शेवटच्या आठवड्यात या प्रकरणावर अंतिम निर्णय घेतला जाईल.

दरम्यान, सरकारनेही या गंभीर प्रकरणाची दखल घेतली असून, या प्रकरणाच्या सखोल चौकशीसाठी निवृत्त उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती आर. एम. एस. खांडेपारकर यांच्या अध्यक्षतेखालील चार सदस्यीय उच्चस्तरीय समिती स्थापन केली आहे. या समितीत निवृत्त आयपीएस अधिकारी आणि गोवा सरकारचे माजी डीआयजी बॉस्को जॉर्ज, गोवा विद्यापीठाचे माजी कुलसचिव डॉ. राधिका नायक, तसेच व्ही. एम. साळगावकर लॉ कॉलेजचे प्राध्यापक एम. आर.के. प्रसाद यांचा समावेश आहे. समितीला तातडीने अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

पेपरफुटीचा मुद्दा गेल्या रविवारी उफाळला होता, जेव्हा कार्यकर्ते काशीनाथ शेट्ये यांच्या नेतृत्वाखालील एका गटाने आगशी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. या तक्रारीत, सहाय्यक प्राध्यापकांनी एका विद्यार्थिनीला प्रश्नपत्रिका पुरवली असल्याचा आरोप करण्यात आला होता. या आरोपांनंतर विद्यापीठात संतापाची लाट उसळली, परिणामी संबंधित प्राध्यापकांना निलंबित करण्यात आले. विद्यापीठ प्रशासनाने तातडीने दोन सदस्यीय तथ्य शोध समिती स्थापन केली होती. या समितीने बुधवारी राज्यपाल आणि कुलगुरू पी.एस. श्रीधरन पिल्लई आणि कुलगुरू डॉ. हरिलाल बी. मेनन यांना अहवाल सादर केला. समितीला केवळ ४८ तासांच्या आत अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले होते. दरम्यान, विद्यापीठाने कोणत्याही चुकीच्या कृत्याचा इन्कार केला

पान २ ▶

निवडक

मेहुल चोक्सी पुन्हा फरार

अँटिग्वा, दि. २१ :पंजाब नॅशनल बँकमध्ये झालेल्या कोट्यवधीच्या घोटाळ्याप्रकरणातील आरोपी मेहुल चोक्सी आता अँटिग्वामधूनही फरार झाल्याची माहिती मिळाली आहे. या घोटाळ्याप्रकरणी त्याचा शोध सुरू असल्यावर तो अँटिग्वामध्ये असून त्याने तेथे नागरिकत्व घेतल्याची माहिती मिळाली होती. देशाबाहेर पळून गेल्यानंतर तो तपास यंत्रणांना हुलकावणी देत होता. आता तो अँटिग्वामधूनही फरार झाल्याची माहिती मिळाली आहे. अँटिग्वा आणि बरबुडाचे परराष्ट्रमंत्री चॅग ग्रीन यांनी ही माहिती दिली आहे. मेहुल चोक्सी हा आता अँटिग्वामध्ये नाही आहे. मेहुल चोकसी हा उपचारांसाठी अन्यत्र कुठेतरी गेला आहे. आमच्या देशाची नागरिकत्व योजना ही विश्वसनीय आहे. तसेच त्यामध्ये विविध स्तरांवर पडताळणी केली जाते. चोक्सीला नागरिकत्व दिलं गेलं तेव्हा त्याने भारत किंवा इतर कुठल्याही देशातील कायद्यांचं उल्लंघन केल्याची बाब समोर आली नव्हती. आता फरार झालेल्या चोक्सीचा शोद पुन्हा घेण्यात येत आहे. याप्रकरणी अँटिग्वा सहकार्य करणार असल्याचेही सांगण्यात आले.

---

१८ आमदारांचे कर्नाटकात निलंबन

बंगळुरू, दि. २१ : कर्नाटकमध्ये सध्या हनी ट्रॅपचा मुद्दा चांगलाच तापला आहे. सहकार मंत्री के.एन.राजन्ना यांनी विधानसभेत बोलताना केलेल्या एका दाव्यानंतर राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. एका केंद्रीय नेत्यासह ४८ नेते हनी ट्रॅपमध्ये अडकल्याचा दावा मंत्री के.एन.राजन्ना यांनी केला. त्यांच्या या दाव्यानंतर आज कर्नाटकच्या विधानसभेत विरोधकांनी सत्ताधाऱ्यांना चांगलंच घेरले. यातच आज कर्नाटक सरकारने सरकारी कंत्राटांमध्ये मुस्लिमांना ४ टक्के आरक्षण देणारं विधेयक मंजूर केले. त्यामुळे हनी ट्रॅपचा मुद्दा आणि सरकारी कंत्राटांमध्ये मुस्लिमांना ४ टक्के आरक्षण देणारं विधेयकाच्या विरोधात भारतीय जनता पक्षाच्या आमदारांनी विधानसभेत मोठा गदारोळ केला. सरकारच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. एवढंच नाही तर काही आमदारांनी विधानसभा अध्यक्षांच्या खुर्चीवर काही कागदपत्रे भिरकावली. त्यामुळे सभागृहात गोंधळ घातल्याप्रकरणी आता भाजपाच्या १८ आमदारांवर निलंबन कारवाई करण्यात आली आहे.

मनीष सिसोदिया पंजाबचे प्रभारी

नवी दिल्ली, दि. २१ : दिल्ली विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर आम आदमी पक्षाने (आप) पक्षांतर्गत मोठा बदल केला आहेत. दिल्लीचे माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांची पंजाब प्रभारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे, तर सत्येंद्र जैन यांना सह-प्रभारी बनवण्यात आले आहे. मनीष सिसोदिया यांची पंजाबचे प्रभारी, तर दिल्ली प्रभारपदी गोपाळ राय यांच्या जागी सौरभ भारद्वाज यांची नियुक्ती करण्यात आली आहे. गोपाल राय यांच्याकडे गुजरातची तर पंकज गुप्ता यांच्याकडे गोव्याचे प्रभारी म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे. दरम्यान, पक्षाच्या राजकीय व्यवहार समितीच्या बैठकीसाठी आज खासदार राघव चड्ढा आणि संजय सिंह यांनी राष्ट्रीय संयोजक अरविंद केजरीवाल यांच्या निवासस्थानी हजर होते.

हवामान

कमाल : २८ किमान : २३

आर्द्रता : ७५

बाजार भाव

सोने : ₹ ७१,७८० (१० ग्रॅम)

चांदी : ₹ ८५,१०० (१ किलो)

शेअर मार्केट

सेन्सेक्स : ८२,३६५ .७७↑ (२३१.१६)

निफ्टी : २५,२३५.९० ↑ (८३.९५)

स्टेडियमच्या खासगीकरणाला विरोध

▶डॉ. मुखर्जी स्टेडियम भाड्याने देण्याच्या निर्णयाविरोधात मूक मोर्चा

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. २१ : गोवा विद्यापीठ शिक्षक संघटना, पदव्युत्तर विद्यार्थी संघटना आणि अन्य कर्मचाऱ्यांनी ताळगाव येथील डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी इनडोअर स्टेडियम एका खाजगी इव्हेंट मॅनेजमेंट कंपनीला दहा वर्षांसाठी भाड्याने देण्याच्या निर्णयाविरोधात मूक मोर्चा काढला. हा मोर्चा विद्यापीठाच्या प्रशासकीय ब्लॉकमधून काढण्यात आला.

संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी आरोप केला की, खाजगी व्यवस्थापनामुळे स्टेडियममध्ये गैर-क्रीडा उपक्रमांना वाव मिळेल, परिणामी कॅम्पस सर्वसामान्यांसाठी खुला होईल आणि त्याचा विद्यार्थी व प्राध्यापकांवर विपरीत परिणाम होईल.

याबाबत पत्रकारांशी संवाद साधताना प्राध्यापक रामाराव वाघ यांनी सांगितले की, श्यामाप्रसाद मुखर्जी इनडोअर स्टेडियम हे क्रीडा क्षेत्रासाठी जागतिक दर्जाच्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी उभारण्यात आले होते. गेल्या वर्षी येथे राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा पार पडल्या. मात्र, आता हे स्टेडियम सार्वजनिक-खाजगी भागीदारी (पीपीपी) मॉडेलअंतर्गत एका इव्हेंट मॅनेजमेंट कंपनीला सोपवले जात आहे, ही बाब अतिशय चिंताजनक आहे.

त्यांनी पुढे सांगितले की, सरकारचा हा निर्णय चुकीचा असून यामुळे क्रीडा क्षेत्राला प्रोत्साहन देण्याच्या आमच्या प्रयत्नांना धक्का बसणार आहे. याशिवाय, गैर-क्रीडा उपक्रमांमुळे कॅम्पस परिसरात गोंधळ, वाहतूक कोंडी, आणि सुरक्षेचा प्रश्न निर्माण होईल. तसेच, याचा जैवविविधतेवरही विपरीत परिणाम होऊ शकतो.

संघटनांनी सरकारला हा निर्णय मागे घेण्याची आणि विद्यापीठानेच स्टेडियमच्या व्यवस्थापनाची जबाबदारी घ्यावी, अशी मागणी केली आहे. जर सरकार स्वतः ही सुविधा चालवू शकत नसेल, तर ती केवळ क्रीडा उपक्रमांसाठी वापरणाऱ्या संस्थांकडे द्यावी, असेही वाघ यांनी स्पष्ट केले. गुरुवार, २० मार्च रोजी झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत २५ लाख रुपये मासिक उत्पन्नाच्या अटीवर हे स्टेडियम दहा वर्षांसाठी एका खाजगी कंपनीला भाड्याने देण्यास मान्यता देण्यात आली. या निर्णयावर शिक्षक, विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी असून, सरकारने तातडीने पुनर्विचार करावा, अशी मागणी केली जात आहे.

काँग्रेस युतीसाठी आग्रही नाही : निंबाळकर

२०२७ च्या निवडणुकीत गोमंतकीय जनताच पाठिंबा देणार असल्याचा विश्वास

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. २१ : अखिल भारतीय काँग्रेस समितीच्या (एआयसीसी) सचिव व गोवा प्रभारी अंजली निंबाळकर यांनी आम आदमी पक्ष (आप) आणि तृणमूल काँग्रेस (टीएमसी) यांना २०२२ च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसच्या संधी धोक्यात आणल्याबद्दल तीव्र शब्दांत सुनावले. त्यांनी विश्वास व्यक्त केला की, २०२७ च्या विधानसभा निवडणुकीत गोव्यातील जनता काँग्रेसला पाठिंबा देईल.

शुक्रवारी पणजीत पक्षाच्या एका कार्यक्रमात प्रसारमाध्यमांशी बोलताना निंबाळकर म्हणाल्या, मी गोव्यात काँग्रेस संघटन बळकट करण्यासाठी आले आहे. जर यामुळे कुणाला धक्का बसत असेल, तर तो त्यांचा प्रश्न आहे. प्रत्येक पक्षाने आपल्या संघटनेसाठी कार्य करावे. २०२७ च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेस कशा प्रकारे विजय मिळवेल, याचा निर्णय मी आणि माझे हायकमांड घेऊ. याच दृष्टीने मी प्रत्येक मतदारसंघाला भेट देत आहे.

आपच्या नेत्या आतिशी यांनी सलग दोन निवडणुकांनंतर काँग्रेसचे ८० टक्के आमदार भारतीय जनता पक्षात (भाजप) सामील झाल्याच्या वक्तव्यावर प्रतिक्रिया देताना निंबाळकर म्हणाल्या की, भाजपमध्ये प्रवेश करणे हा काँग्रेससाठी मृत्यू आहे. आमच्यासाठी हे आमदार आता अस्तित्वात नाहीत. एखादी व्यक्ती मेली, तर आपण फक्त काही दिवस दुःख व्यक्त करतो आणि नंतर पिंडदान करून पुढे जातो. काँग्रेसही याचप्रमाणे पुढे जाणार आहे. गोव्यातील जनतेचा काँग्रेसवर विश्वास आहे.

राजकीय युतीच्या शक्यतेवर बोलताना निंबाळकर म्हणाल्या, कोणत्याही पक्षाशी युती केली जाणार नाही. मात्र, हा अंतिम निर्णय माझा नसून हायकमांड घेईल. त्यांनी स्पष्ट केले की इंडिया ब्लॉक फक्त लोकसभा निवडणुकीपुरता होता आणि राज्य विधानसभा किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी नव्हता. हरियाणा आणि दिल्लीमध्ये काँग्रेस व आपमध्ये युती झाली नाही, हे त्यांनी अधोरेखित केले.

दरम्यान, काही तासांनंतर आपचे प्रदेशाध्यक्ष ॲड. अमित पालेकर यांनी आपल्या एक्स हँडलवर प्रतिक्रिया देत म्हटले की , निंबाळकर यांच्या तर्कानुसार काँग्रेसने भाजपात विलीन व्हावे किंवा गोव्यात निवडणुकीत सहभागी होऊ नये. कारण, काँग्रेसचे दोनदा निवडून आलेले आमदार आणि विरोधी पक्षनेते भाजपमध्ये गेले आहेत. काँग्रेसच्या उर्वरित आमदारांच्या अलीकडील विधानांवरूनही त्यांचा भाजपकडे कल असल्याचे दिसते. त्यामुळे काँग्रेसने सरळ भाजपसोबत युती करून गोवा काँग्रेसला भाजपामध्ये विलीन करावे.

आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानक २०३१ मध्ये होणार बंद

वॉशिंग्टन, दि. २१ : नऊ महिन्यांच्या अंतराळ मोहिमेनंतर अमेरिकन अंतराळवीर सुनीता विल्यम्स पृथ्वीवर परतल्याने आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानक पुन्हा चर्चेत आले आहे. १९९८ मध्ये सुरू झालेल्या या प्रकल्पाचा कार्यकाळ २०३१ मध्ये संपणार असल्याचे अधिकृतरीत्या जाहीर करण्यात आले आहे.

सुमारे ४१५ किलोमीटर उंचीवर असलेले आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानक हे फुटबॉल मैदानाच्या आकाराएवढे (१०९ मीटर लांब) असून त्याचे वजन चार लाख किलोग्रॅम (सुमारे ४०० टन)आहे. रशिया, अमेरिका, कॅनडा, जपान आणि युरोपियन देशांनी मिळून हे अंतराळ स्थानक उभारले आहे. दररोज सरासरी १६ वेळा पृथ्वीभोवती प्रदक्षिणा घालणारे हे स्थानक विज्ञान संशोधन आणि अंतराळ उद्योगातील आंतरराष्ट्रीय सहकार्याचे प्रतिक आहे.

आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानक सुरुवातीला फक्त १५ वर्षांसाठी तयार करण्यात आले होते. मात्र, अंतराळ संशोधनातील यशस्वी प्रयोगांमुळे त्याचा कार्यकाळ अनेक वेळा वाढवण्यात आला. अमेरिकेचे माजी अध्यक्ष जो बिडेन यांच्या प्रशासनाने २०३० पर्यंत आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानक चालू ठेवण्याचा निर्णय घेतला होता. परंतु, २०२१ मध्येच रशियानेआंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकच्या वृद्ध झालेल्या उपकरणांबद्दल चिंता व्यक्त केली होती. रशियन अंतराळवीर व्लादिमीर सोलोव्योव्ह यांनी सांगितले होते की, आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानक च्या रशियन विभागातील ८० टक्के उपकरणे जुनी झाली असून, त्यात लहान भेगाही दिसू लागल्या आहेत. स्पेसएक्सचे



संस्थापक इलॉन मस्क यांनी तर २०२३० पर्यंत वाट पाहण्याचीही गरज नाही, असे मत मांडले होते.आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानक चे उद्दिष्ट पूर्ण झाले असून आता मंगळावर लक्ष केंद्रित करावे, असे त्यांनी सुचवले होते.

आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकबंद करण्याच्या प्रक्रियेला २०२६ ते २०३० या कालावधीत गती दिली जाईल.प्रथम,आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकचा वेग कमी करण्यासाठी रशियन स्पेसक्राफ्ट 'प्रोग्रेस' आणि इतर प्रोपल्शन मॉड्यूल्सचा वापर केला जाईल. हळूहळूआंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकची उंची ४१५ किमी वरून २८० किमी पर्यंत खाली आणली जाईल. नंतर, विशेष यानाच्या मदतीने त्याचा उर्वरित प्रवास १२० किमीपर्यंत खाली आणण्यात येईल. पृथ्वीच्या वातावरणात प्रवेश करताना, आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानक चे बहुतांश भाग घर्षणामुळे जळून नष्ट होतील. उरलेले अवशेष पॅसिफिक महासागरातील पॉइंट निमो' या निर्जन भागात टाकण्यात येतील. नासा च्या माहितीनुसार, आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानक बंद होण्यापूर्वीच खाजगी कंपन्यांची स्पेस स्टेशने कार्यान्वित होणार आहेत. नासा ने 'स्पेस एक्स ' सोबत ८४.३० दशलक्ष डॉलर किमतीचा करार केला आहे. 'ॲक्झिम स्पेस ' आणि ' ब्ल्यू ओरिजिन ' या कंपन्यांनाही व्यावसायिक स्पेस स्टेशन्स तयार करण्यासंदर्भात करार देण्यात आला आहे. यानंतर, नासा चंद्र आणि मंगळ मोहिमांवर अधिक लक्ष केंद्रित करणार आहे. आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकबंद झाल्यानंतर जागतिक अंतराळ उद्योगात मोठे बदल होण्याची शक्यता आहे. भारत २०२३५ पर्यंत इंडियन स्पेस स्टेशन ' सुरू करण्याच्या तयारीत आहे. इस्रोचे माजी अध्यक्ष एस. सोमनाथ यांनी सांगितले होते की, त्याचा पहिला भाग २०२८ मध्ये कार्यान्वित केला जाईल. चीनने २०२२ मध्ये तियांगॉन्ग' हे आपले स्पेस स्टेशन लॉन्च केले आहे.आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकबंद झाल्यानंतर चीनचे स्पेस स्टेशन जागतिक स्तरावर महत्त्वाचे ठरू शकते.

आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानक बंद होत असले तरीही, खाजगी कंपन्यांची पुढील पिढीची स्पेस स्टेशन्स आणि चंद्र-मंगळ मोहिमा अंतराळ संशोधनासाठी नवी दिशा ठरतील. २०३१ नंतर, पृथ्वीच्या कक्षेतील अंतराळ संशोधन निजी क्षेत्राच्या पुढाकारावर अवलंबून असेल, तर प्रमुख सरकारी संस्थांचे लक्ष चंद्र आणि मंगळ मोहिमांवर केंद्रित राहील.